संक्षिप्त फौ. ख. क्र. २१८/२०२३
सरकार -वि.- संजय
नि.क्र. १३ खाली.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - संदिप दिगंबर बिनेकर,
वय ३८ वर्षे, व्यवसाय – खाजगी,
राहणार – नागपूर, ता. जि. नागपूर.

<u>**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत**</u>

१. मी आरोपीला ओळखत नाही. घटना दि.१७.०३.२०२३ रोजी संध्याकाळी ७.०० वा. भिवापूरपासून पाच ते सात कि.मी. अंतरावर एका गावाजवळ घडली. त्यादिवशी मी सायं.४.०० वा. माझ्या कामानिमीत्त ब्रम्हपूरीवरुन माझी मोटार सायकल क्र.एम.एच.३१-डब्ल्यू.एस.४८६९ ने निघालो होतो. त्यानंतर मी भिवापूरवरुन पाच ते सात कि.मी. अंतरावर गाडी चालवत असताना तेव्हा माझी गाडी कमी वेगात होती त्यावेळी माझ्या मोटार सायकलवर मागे माझा मित्र अमोल शेडके बसलेला होता. आमची गाडी कमी वेगात चालत असताना अचानक उजव्या बाजूने एक डेडलाईट ट्रॅक्टर आला त्याचा क्रमांक मी सांगू शकत नाही. तो ट्रॅक्टर अचानक आल्यामुळे माझी गाडी त्यावर धडकली त्यामुळे मी बेशुद्ध पडलो. त्यानंतर माझ्या मित्राने मला भिवापूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. तेथून मला नागपूर येथे पुढील उपचाराकरिता पाठविण्यात आले तेथून मला अतिदक्षता विभागात खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर आठ दिवसांनी मला रुग्णालयातून डिचार्ज मिळाला त्यावेळी पोलीस माझ्याकडे चौकशीकरिता आले होते. त्या धडकेमुळे माझ्या छातीला मार लागला त्यामुळे माझ्या

छातीचे तीन हाड तडे पडले होते. जो व्यक्ती ट्रॅक्टर चालवत होता त्याला मी पाहिल्यास ओळखू शकत नाही. कारण त्यावेळी मी बेशुद्ध पडला. माझ्या सोबत असलेल्या मित्राने मला सांगितले की, अपघात झाल्यानंतर तो ट्रॅक्टर चालक घटनास्थळावरुन पळून गेला होता.

सरतपास संपला.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मित्राने मला सांगितले होते की, ट्रॅक्टर चालक पळून गेला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, ट्रॅक्टर उजव्या बाजूने आला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, ट्रॅक्टरमुळे माझा अपघात झाला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.<br>
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,<br>
माझे समक्ष,<br>
स्वा/-<br>
(एस. जे. लाड)<br>
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,<br>
भिवापूर.

दिनांक - १९.०१.२०२६